सत्यमेव जयते

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

**क्रमांक- एडीव्ही-३११९/सीआर-६०/२०१८/नऊ** **दिनांक :- २० जून, २०१९**

# घोषणा

## दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (पूर्व ) परीक्षा -२०१९
## जाहिरात क्रमांक - ०२/२०१९

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ७ एप्रिल , २०१९ रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (पूर्व) परीक्षा -२०१९, चा निकाल दिनांक २० जून, २०१९ रोजी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, मुख्य परीक्षेसाठी विहित मुदतीत अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. तपासणीअंती अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी, आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**३.** मुख्य परीक्षा दिनांक १८ ऑगस्ट, २०१९ रोजी मुंबई, औरंगाबाद व नागपूर या तीन जिल्हा केंद्रावर घेण्यात येईल. मुख्य परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा दिनांक / कालावधी तसेच अधिसूचना लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

**४.** पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्विकारार्ह आहेत. उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे, त्यात परीक्षा केंद्र नमूद करणे व परीक्षा शुल्क विहित मुदतीत भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

उपसचिव, (परीक्षा-२)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.